पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- ०४/०३/२०२०

## जांभूळखेडा घटनेचा सुत्रधार कुख्यात नक्षल डीव्हिसीएम दिनकर गोटा यास अटक

- **१८ लाखांचे ईनाम जाहिर असलेल्या दोन नक्षलींना अटक करण्यात गडचिरोली पोलीस दलास यश.**

कुरखेडा तालुक्यातील मौजा दादापूर येथे नक्षलींनी ३६ वाहने जाळली होती. यानंतर १ मे २०१९ रोजी नक्षलींनी भूसुरुंगाचा स्फोट घडवुन आणला. यामध्ये गडचिरोली पोलीस दलाचे १५ जवान व १ खाजगी वाहन चालक शहीद झाले होते. या घटनेच्या मुख्य सुत्रधारापैकी एक असलेला व त्यावेळी नक्षलवाद्यांच्या उत्तर गडचिरोली विभागीय कमिटीचा तसेच कोरची दलमच्या डिव्हीसीएम पदावर कार्यरत असलेला दिनकर गोटा यास व कोरची दलमच्या सदस्य पदावर कार्यरत असलेली महिला नक्षली सुनंदा कोरेटी हिस मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांना मिळालेल्या गोपनिय माहितीनुसार गडचिरोली पोलीस दलाच्या विशेष तपास पथकाने आज पहाटे गडचिरोली पोलीस स्टेशनच्या हद्दीतुन अटक केली.

नक्षली दिनकर गोटा हा सन- २००५ मध्ये नक्षलवाद्यांच्या टिपागड दलममध्ये सदस्य पदावर कार्यरत होता. यानंतर सन- २००६ मध्ये चातगाव दलम, सन- २००७ मध्ये टिपागड दलमचा एरिया कमिटी मेंबर, सन-२००८ मध्ये धानोरा दलममध्ये कमांडरपदी कार्यरत, सन- २०११ मध्ये टिपागड दलमचा एरिया कमिटी सचिव, सन- २०१६ पासुन कोरची दलममध्ये उत्तर गडचिरोली डिव्हीजनच्या विभागीय समिती सदस्य पदावर तो कार्यरत होता. एकुणच गडचिरोली जिल्ह्याच्या उत्तर भागात त्याची पकड होती. दिनकर गोटा याचेवर गडचिरोली पोलीस दलातील विविध पोस्टे, उपपोस्टे व पोमके येथे **एकुण १०८ गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. यात ३३ खूनांचा समावेश आहे.** त्याचबरोबर सन- २००९ साली मरकेगाव चकमकीत त्याचा सहभाग होता. मौजा दादापूर येथील वाहनांची जाळपोळ व दिनांक ०१ मे २०१९ रोजी मौजा जांभूळखेडा येथे भूसुरुंग स्फोट घडविण्यात तो मुख्य सुत्रधार आहे. या ठिकाणांची रेकी व प्लॅनिंगमध्ये त्याचा सक्रिय सहभाग होता. **शासनाने दिनकर गोटावर एकुण १६**

**लाख रूपयाचे बक्षीस जाहिर केले होते.** तर नक्षली सुनंदा कोरेटी ही सन- २००९ मध्ये नक्षल दलममध्ये भरती झाली. सध्या ती नक्षलवाद्यांच्या कोरची दलम सदस्य पदावर कार्यरत होती. **तिचेवर एकुण ३८ गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. शासनाने तिचेवर एकुण ०२ लाख रूपयाचे बक्षीस जाहिर केले होते.**

दिनांक २८ फेब्रुवारी २०२० रोजी मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांच्या समोर उत्तर गडचिरोली विभागीय समिती सदस्य पदावर कार्यरत असलेला विलास कोल्हा याने एके-४७ शस्त्रासह आत्मसमर्पण केले होते. तर नुकतेच चातगाव दलम कमांडरसह संपुर्ण चातगाव दलमने आत्मसमर्पण केले होते. जांभुळखेडा घटनेतील ८ आरोपींना गडचिरोली पोलीस दलाने यापुर्वीच अटक केलेली असुन घटनेचा संपुर्ण तपास करुन तपास एनआयए कडे हस्तांतरीत करण्यात आला होता. यानंतर आज गडचिरोली पोलीस दलाने नक्षलींच्या उत्तर गडचिरोली डिव्हीजनचा विभागीय समितीचा सदस्य असलेला आणि दादापुर,जांभुळखेडा घटनेचा कट रचण्यात व कटाची अंमलबजावणी करण्यात प्रमुख भुमिका बजावलेल्या कुख्यात नक्षली दिनकर गोटा यास अटक केल्याने उत्तर गडचिरोली भागात नक्षलवाद्यांना जबर धक्का देण्यात गडचिरोली पोलीस दलाने यश मिळविले आहे. नक्षली दिनकर गोटा व सुनंदा कोरेटी हीस आज रोजी मौजा दादापूर येथील वाहन जाळपोळ प्रकरणी पुराडा पोस्टे येथे दाखल गु.रं.न. २०/२०१९ कलम ४३५, ४२७, १४३, १४७, १४८, १४९, १२० (ब) भादंवि, सहकलम ५/२८ भाहका,१३५ मपोका,१६,१८,२०,२३ युएपी ॲक्टनुसार दाखल गुन्हयात अटक करुन आज रोजी मा. न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने दोघांनाही १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

दिनकर गोटा हा सन- २०१९ माहे सप्टेंबर मध्ये एका नक्षल महिलेसह दलम मधून निघुन गेल्याबाबतची माहिती गडचिरोली पोलीस दलास मिळाली होती. यानंतर सातत्याने गडचिरोली पोलीस दल नक्षली दिनकर गोटा याच्या मागावर होते. अखेर आज गडचिरोली पोलीस दलाच्या अखंड प्रयत्नांना यश येवुन जहाल नक्षली दिनकर गोटा व सुनंदा कोरेटी यांना जेरबंद करण्यात गडचिरोली पोलीस दलास यश प्राप्त झाले. दिनकर गोटाच्या अटकेमुळे दिनांक ०१ मे २०१९ रोजी जांभूळखेडा घटनेतील शहीद जवानांना न्याय मिळाल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

मा. पोलीस अधीक्षक सो. यांनी नक्षलवाद्यांना आत्मसमर्पण करण्याचे आवाहन या निमित्ताने केले आहे. त्याचबरोबर गडचिरोली पोलीस दल नक्षलविरोधी अभियान आणखी तिव्र करण्याचे संकेत दिले आहेत. तसेच दिनकर गोटा यास अटक करणाऱ्या विशेष पोलीस तपास पथकाचे मा. पोलीस अधीक्षकांनी अभिनंदन केले असुन,या संपुर्ण विशेष पोलीस पथकास पारितोषिक जाहिर केले आहे.


GADCHIROLI POLICE
वीर भोग्या वसुंधरा
FORTUNE FAVOURS THE BRAVE